# गुलफिशा फातिमासह दिल्ली दंगलीतील चार आरोपी तुरुंगाबाहेर, सर्वोच्च न्यायालयाने मंजूर केला होता जामीन






दिल्ली । दिव्य वार्ता ।

**सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर झाल्यानंतर कडकडडुमा येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश समीर बाजपेयी यांनी गुलफिशा फातिमा, मीरान हैदर, शिफा उर रहमान आणि मोहम्मद सलीम खान यांनी दाखल केलेले दोन लाख रुपयांचे जामीन बाँड आणि तितक्याच रकमेचे बाँड दोन स्थानिक जामीनदारांकडून स्वीकारून त्यांच्या सुटकेचे आदेश दिले. तुरुंग प्रशासनाच्या माहितीनुसार, गुलफिशा फातिमा, शिफा उर रहमान आणि मीरान हैदर यांची बुधवारी रात्री तिहार तुरुंगातून सुटका करण्यात आली, तर मोहम्मद सलीम खान यांची मंडोली तुरुंगातून सुटका करण्यात आली.**

पीटीआय या वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार पाचवा आरोपी शादाब अहमद जामीन बाँड जमा करण्यासाठी न्यायालयात हजर झाला नाही. त्यामुळे त्याची सुटका होऊ शकली नाही. सोमवारी (५ जानेवारी) सर्वोच्च न्यायालयाने ज्या पाच आरोपींना जामीन मंजूर केला त्यामध्ये शादाब अहमद यांचाही समावेश आहे. मात्र, या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने उमर खालिद आणि शरजील इमाम यांचा जामीन अर्ज फेटाळला. इतर आरोपींच्या तुलनेत उमर खालिद आणि शरजील इमाम यांची भूमिका वेगळी असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

पाच वर्षांपूर्वी दिल्लीच्या ईशान्य भागात जातीय हिंसाचार झाला होता. यात अनेकांनी आपला जीव गमवावा लागला. हिंसाचाराच्या आरोपाखाली अनेकांना अटक झाली. दिल्ली पोलिसांचा असा आरोप आहे की, या लोकांनी नागरिकत्व सुधारणा कायद्याविरोधात झालेल्या निदर्शनादरम्यान अशांतता पसरवण्याचा कट रचला होता. आरोपींचं म्हणणं आहे की ते अनेक वर्षांपासून तुरुंगात आहेत आणि खटला अद्याप सुरू झालेला नाही. खटल्याला झालेल्या विलंबामुळे त्यांची सुटका करण्यात यावी. त्यांनी असा मुद्दाही उपस्थित केला की, देवांगना कलिता आणि नताशा नरवाल सारख्या इतर आरोपींना या प्रकरणात जामीन मंजूर करण्यात आला आहे.

९ जूनला झालेल्या सुनावणी दरम्यान दिल्ली पोलिसांच्यावतीनं युक्तिवाद करताना सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी आरोपींच्या जामीन अर्जांना विरोध केला. ते म्हणाले की दिल्लीतील दंगली केवळ दंगली नव्हत्या तर भारताच्या सार्वभौमत्वावर हल्ला होता. शिवाय, शर्जील इमामच्या भाषणांवर आणि उमर खालिद तसेच गुलफिशा फातिमा यांच्या विरोधात दिलेल्या साक्षीदारांच्या जबाबांवर भर देत तुषार मेहता म्हणाले की हिंसाचार भडकवण्याचा एक सुनियोजित कट केला गेला होता. ते म्हणाले, आता असं म्हटलं जात आहे की बुद्धिजीवी तुरुंगात आहेत. मला हे दाखवायचं आहे की हे 'बुद्धिजीवी' काय करत होते. या प्रकरणात २० जणांना आरोपी बनवण्यात आलं आहे. पोलिसांच्या मते, या प्रकरणातील ६ आरोपींना जामीन मिळाला आहे, १२ अजूनही तुरुंगात आहेत आणि २ आरोपी फरार आहेत.

## 'न्याय मिळाला... पण अपूर्ण'

जेव्हा हा निकाल देण्यात आला तेव्हा शादाब स्वत: न्यायालयात उपस्थित होते. ते म्हणतात, आम्हाला मोठी शिक्षा होईल, असं सागून तुरुंगात घाबरवलं जात होतं. मी काही केलंच नव्हतं. त्यामुळं मला कुठली भीती नव्हती. शादाब यांनी ते काम करत असलेल्या औषधाच्या दुकानातील सीसीटीव्ही फुटेज न्यायालयात जमा केले होते. त्याचबरोबर त्यांनी आपल्या मोबाइलचे लोकेशनही दाखवले होते. दिलशाद अली हे शादाब आलम यांचे वडील आहेत. वकिलांशी समन्वय साधणं असो किंवा न्यायालयाची सुनावणी. या खटल्यात तेच धावपळ करत होते. दिलशाद अली सांगतात की, जेव्हा त्याला अटक झाली, तेव्हा आम्ही दोन वेळा जामिनासाठी वेगवेगळ्या कोर्टात गेलो. पण त्याला जामीन मिळाला नाही. आम्ही मानवाधिकार आयोगालाही पत्र लिहिलं. त्याला जामीन मिळण्यास तब्बल ८० दिवस लागले.

## चार वर्षांनंतर शादाब ठरला निर्दोष

२३ फेब्रुवारी २०२० मध्ये दयालपूर येथे एका मुस्लीम व्यापाऱ्याचं चिकनचं दुकान जाळण्यात आलं होतं. त्याचबरोबर अनेक हिंदूंच्या गाड्यांची तोडफोडही करण्यात आली होती. या प्रकरणी तक्रारी आल्यानंतर पोलिसांनी ११ मुसलमानांना अटक केली. पोलिसांच्या मते, एका गुप्त खबऱ्यानं यातील नऊ लोकांबाबत माहिती दिली होती. उर्वरित लोकांचा शोध सीसीटीव्ही व्हीडिओतून लागला होता. याप्रकरणी पोलिसांनी चार आरोपपत्र दाखल केले. दोन प्रत्यक्षदर्शी साक्षीदार सादर केले. या प्रत्यक्षदर्शींनी मुसलमानांचा एक गट घोषणा देत तोडफोड करताना पाहिल्याची साक्ष नोंदवली. परंतु, न्यायालयात हा खटला टिकूच शकला नाही. न्यायालयानं केवळ पोलिसांचं आरोपपत्र पाहूनच सर्व संशयित आरोपींना मुक्त केलं.

## हिंसाचाराचा तपास : कुठून कुठपर्यंत?

गेल्या वर्षी मार्चमध्ये दिल्लीच्या कडकडडूमा न्यायालयानं शादाब आणि इतर १० आरोपींविरुद्ध पोलिसांकडे कोणतेही पुरावे नसल्याचे सांगितलं आणि सर्वांना 'मुक्त' केलं. जेव्हा पोलीस 'आरोपपत्र' दाखल करतात, तेव्हा न्यायालय ते पाहून आरोपींविरोधात 'आरोप' निश्चित करतात, आणि जर पुरावा नसेल तर त्यांना 'मुक्त' केलं जातं. खटला रद्द केला जातो. दिल्ली दंगलीला आता पाच वर्षे होत आहेत. यादरम्यान काही लोकांच्या आयुष्यात खूप काही बदल झाले आहेत. हिंसाचाराच्या आरोपाखाली अनेक लोक तुरुंगात कैद आहेत. तर अनेक जण कित्येक महिने तुरुंगात घालवल्यानंतर निर्दोष मुक्त झाले आहेत. दंगलीशी निगडित ७५८ एफआयआरची नोंद पोलिसांकडे झाली होती. आतापर्यंत ज्या खटल्यांचे निर्णय झाले. त्यातील ८० टक्क्यांहून जास्त प्रकरणातील लोक एकतर निर्दोष सुटले किंवा त्यांना मुक्त करण्यात आलं आहे.

## २०20 मधील दिल्लीतील जातीय हिंसाचार

दिल्लीतील ईशान्य भागात २४ फेब्रुवारी २०२० रोजी जातीय हिंसाचार सुरू होता. त्यावेळी वजिराबाद परिसरात २५ वर्षीय शादाब आलम एका औषधाच्या दुकानाच्या छतावर आपल्या सहकाऱ्यांसोबत बसले होते. शादाब त्याच दुकानात कामाला होते. ते म्हणाले, पोलीस आले, त्यांनी जाळपोळ होत आहे. दुकान बंद करा असं सांगितलं. मग आम्ही दुकान बंद करुन वर गेलो. शादाब पुढे म्हणाले की, त्यानंतर काही वेळातच पोलीस छतावर आले. आम्हाला आमचं नाव विचारलं आणि खाली घेऊन गेले. आम्हाला त्यांच्या गाडीत बसवलं आणि पोलीस ठाण्याला आणलं. मला ताब्यात घेत असून चौकशीनंतर सोडून देऊ असं ते म्हणाले. आम्हाला ताब्यात का घेतलं हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला, तेव्हा पोलिसांनी आम्ही दंगलीत सहभागी होतो, असं सांगितलं, असं शादाब म्हणाले. त्यानंतर जामीन मिळण्यास शादाब यांना ८० दिवस आणि स्वत:ला निर्दोष सिद्ध करण्यासाठी त्यांचे चार वर्षे गेले.

# अनेक कार्यकर्त्यासह बप्पासाहेब परजणेंचा राष्ट्रवादीमध्ये जाहीर प्रवेश



### शिवछत्र परिवार विजय राजे व जिल्हाध्यक्ष बळी आप्पा गावते यांच्या उपस्थितीत प्रवेश

बीड । दिव्य न्युज ।

खालापुरी पंचायत समिती गण व रायमोहा सर्कल मध्ये गेल्या अनेक वर्षापासून संघटक वाढीसाठी व पक्षासाठी रात्रंदिवस काम करणारे अनेक युवा तरुण आज शिवछत्र परिवारावर आमदार विजयसिंह राजे पंडित यांच्यावर विश्वास ठेवून युवक जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी बळी आप्पा गावते यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादीमध्ये प्रवेश करून येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक मध्ये जोमाने काम करू व जिल्हा परिषद असो व पंचायत समिती या दोन्ही ठिकाणी राष्ट्रवादी पक्षाची ताकद येणाऱ्या काळामध्ये काम करत राहू असा विश्वास पक्षसृष्टीकडे दाखवला आहे गेल्या अनेक वर्षापासून बाबासाहेब परजणे हे विद्यार्थी संघटना तालुकाध्यक्ष या पदाच्या माध्यमातून अनेक तरुणांना वेळोवेळी मार्गदर्शन व मदत करत आहेत कोरोना काळामध्ये सॅनिटायझर असो किंवा राशन किट या माध्यमातून खलापुरी गणामध्ये अनेक गरजू लोकांना मदत करून खालापुरी गणातील युवा तरुणाचा व नागरिकांचा विश्वास जिंकत आहे एवढेच नव्हे तर निराधार योजनेच्या माध्यमातून अनेक माता भगिनींना पगारही चालू करून दिला आहे त्यामुळे बप्पासाहेब परजणे व त्यांचे अनेक सहकारी यांच्यामुळे राष्ट्रवादीची ताकद नक्कीच वाढली आहे आणि येणाऱ्या काळामध्ये या सर्वांचा पक्षाला नक्कीच फायदा होणार आहे.

# बीडच्या पत्रकार शेख आयेशा यांचा मुंबईत वर्षा निवासस्थानी सौ.अमृता फडणवीसांनी केला वाढदिवस साजरा



**मुंबई । दिव्य न्युज ।**

बीड येथील लोकजगतच्या संपादक शेख आयेशा यांनी अतिशय कमी कालावधीत पत्रकारिता क्षेत्रात आणि तृतीयपंथीयांसह सामाजिक कार्यात सुरू केलेले कार्य उल्लेखनीय आहे. यामुळेच आज मी माझ्या एका चांगल्या जिवलग मैत्रिणीचा वाढदिवस वर्षा निवासस्थानी साजरा केला असे प्रतिपादन वाढदिवसानंतर सौ. अमृता देवेंद्र फडणवीस यांनी शुभेच्छा देताना व्यक्त केले.

मुंबई येथील मुख्यमंत्र्यांच्या शासकीय वर्षा बंगल्यावर १ जानेवारी रोजी पत्रकार शेख आयेशा यांचा वाढदिवस मुख्यमंत्री यांच्या सुविधा पत्नी तथा बँकर, सुप्रसिद्ध गायिका, अभिनेत्री आणि सामाजिक कार्यकर्त्या म्हणून प्रसिद्ध असलेल्या सौ.अमृता देवेंद्र फडणवीस यांनी शासकीय वर्षा या बंगल्यावर वाढदिवस साजरा केला. यावेळी त्यांनी पत्रकार शेख आयेशा यांना शुभेच्छा देताना म्हटले की, तृतीयपंथीयांच्या सक्षमीकरणावर आणि अल्पसंख्याक समाजातील अन्यायग्रस्त महिलांना न्याय देण्यासाठी सुरू केलेला लढा निश्चितच कौतुकास्पद आहे. मला देखील सामाजिक कार्य करणाऱ्या महिलांबद्दल कौतुक वाटते. एका ग्रामीण भागातून थेट मुंबई पर्यंत माझ्यासोबत त्यांनी जो विश्वास संपादन केला हि बाब नक्कीच कौतुकास्पद आहे. भविष्यात त्यांच्या आश्रय सेवाभावी संस्थेला आम्ही सामाजिक कार्य करत असलेल्या दिव्याज फाउंडेशन अंतर्गत निश्चित तृतीयपंथीयांसह महिलांच्या समस्या सोडवण्यासाठी सहकार्य करू असा विश्वास व्यक्त केला.

वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ, भेटवस्तू आणि तोंड गोड करून वाढदिवस त्यांनी मोठ्या आनंदाने साजरा केला. वाढदिवसानिमित्त खास निमंत्रित करून कुठलेही नाते संबंध नसतानाही एका ग्रामीण भागातील वृत्तपत्र सृष्टीत काम करणाऱ्या महिलेला मैत्रिण म्हणून बोलावून पाहुण्यांनाही लाजवेल एवढे आदरातिथ्य करून आस्थेवायीकपणे केलेला संपूर्ण पाहुणचार नेत्रदीपक आणि स्वप्नवतच वाटत आहे. माझा माझ्यावरच विश्वास बसत नाही मी एक सामान्य कुटुंबातील अल्पसंख्याक समाजातील महिला असताना सुद्धा थेट मुख्यमंत्र्यांच्या सुविद्य पत्नीने माझा वाढदिवस मुख्यमंत्र्यांच्या शासकीय बंगल्यावर करावा हा माझ्या आयुष्यातील सर्वात अविस्मरणीय क्षण आहे अशा आपल्या भावना त्यांनी आनंदाश्रूनी व्यक्त केल्या.

# जि.प.शाळा पाटेगाव येथे शालेय साहित्य वाटप



**पैठण । दिव्य न्युज ।**

पाटेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते तथा शालेय समिती अध्यक्ष अनिल अंभोरे यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद प्रशालेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच यावेळी विविध सामाजिक उपक्रम राबवत राबवून त्यांच्या वाढदिवसानिमित्त उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थांना शालेय साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले.

पाटेगाव जि. प.प्रशालेच्या प्रांगणात शालेय समिती अध्यक्ष अनिल अंभोरे यांच्या वाढदिवसानिमित आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सरपंच गोकुळ रावस तर प्रमुख पाहुणे उपसरपंच सतिश करपे तसेच शालेय समितीचे उपाध्यक्ष राम काळे,मा. अध्यक्ष सतीश रावस यांची उपस्थिती लाभली.यावेळी सतीश करपे मित्र मंडळ,ग्राम पंचायत कार्यालय व जिल्हा परिषद शाळेतर्फे अनिल अंभोरे यांचा सत्कार करून त्यांच्या दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी शालेय समिती अध्यक्ष अनिल अंभोरे यांनी गावाच्या व शाळेच्या विकासासाठी मी सदैव प्रयत्न करेल असे सांगून गावकरी शिक्षक व मित्र परिवाराचे आभार मानले.यादरम्यान शिल्पकार फ्रेंड ग्रुपच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य तसेच खाऊ,बिस्किटे वाटप करण्यात आली. तर कवी दिलीप सनवे यांच्या तर्फे चॉकलेट वाटप करण्यात आले.यावेळी सरपंच गोकुळ रावस, मुख्याध्यापक दिलीप थोटे, दिलीप सनवे, शुभम चव्हाण,पवार मॅडम, शुभम रावस यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या शेवटी अनिल अंभोरे यांनी गाव व शाळेच्या विकासासाठी मी सदैव प्रयत्न करेल असे सांगून सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमासाठी अतुल पहिलवान, आकाश रावस, केशव मगरे, अनिकेत दळवी, शंकर चव्हाण, प्रकाश अंभोरे, अमोल थोरात, विश्वास मगरे आदींनी परिश्रम घेतले.

# जिल्हा बँकेच्या इतिहासातील सर्वात मोठी चोरी! २२ लॉकर फोडले, ७ किलो सोने, २० किलो चांदी लंपास; चोरांकडून शिताफीने पुरावेही नष्ट

सांगली । दिव्य न्युज ।

सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या झरे (ता. आटपाडी) शाखेत चोरट्यांनी स्ट्राँग रूम फोडत लाखोंचा ऐवज लंपास केला. तब्बल २२ लॉकर्स फोडत चोरट्यांनी सुमारे ७ किलो सोने, २० किलो चांदी आणि मोठी रोकड लंपास केल्याने आता जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. तर चोरांनी हँडग्लोव्हज, तंत्रज्ञान आणि प्लॅनिंग करत चोरी करत पोलिसांनाच थेट आव्हान निर्माण केले आहे. सध्या घटनास्थळी पोलीस पथक दाखल झाले असून श्वान पथक आणि इतर तंत्रज्ञानाचा वापर करून चोरीचा तपास वेगात सुरू केला आहे. तर जिल्हा बँकेच्या इतिहासातील सर्वात मोठी चोरी अशी याची चर्चा आता जिल्ह्यात सुरू झाली आहे.

यावाबत मिळालेली माहिती अशी की, झरे येथील बसस्थानक परिसरातील तुकाराम नाना पडळकर यांच्या मालकीच्या इमारतीत जिल्हा




बँक भाड्याने कार्यरत आहे. काल रात्री अज्ञात चोरट्यांनी पूर्वेकडील बाजूची खिडकी कटरने कापून बँकेत प्रवेश केला. अत्यंत सराईतपणे चोरट्यांनी कटरच्या साहाय्याने स्ट्राँग रूममधील तब्बल २२ लॉकर्स फोडले. ग्राहकाचे लॉकरमध्ये असलेले सुमारे ७ किलो सोने, २० किलो चांदी आणि मोठी रोकड असा कोट्यवधींचा ऐवजही लंपास करण्यात आला आहे. ही धक्कादायक घटना आज सकाळी बँकेचे कर्मचारी कामावर आल्यानंतर उघडकीस आली.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या इशाऱ्यानंतर भाजप-एमआयएम युती तुटली

अकोला। दिव्य वार्ता ।

राज्याच्या राजकारणात खळबळ उडवून देणारी युती आणि आघाडी अंबरनाथ नगरपालिका आणि अकोल नगरपालिकेत झाली होती. मात्र, याबाबत वरिष्ठांना समजताच भाजप आणि काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठांकडून कारवाई करण्यात येत आहे. त्यामुळे, संबंधित स्थानिक नेत्यांकडून ही युती मागे घेतली जात असल्याचंही पाहायला मिळालं. अकोला जिल्ह्यात भाजप आणि एमआयएम यांच्यात युती झाली होती. मात्र, आता एमआयएम अकोटमधील भाजपच्या नेतृत्वाखालील 'अकोट विकास मंचा'तून बाहेर पडले आहे. तर, भाजप प्रदेशाध्यक्षांकडूनही विधानसभा आमदार प्रकाश भरसाखळे यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. तर, अंबरनाथमधील भाजप नेते नरेंद्र पवार यांनी ही युती नसून काँग्रेसने भाजपला विकासासाठी समर्थन दिले आहे, तरीही पक्षाचा आदेश आम्हाला मान्य आहे, असे स्पष्टीकरण दिलं.



## आमदाराला नोटीस, ५ एमआयएम नगरसेवकांनीही काढला पाठिंबा

स्थानिक आघाडीतून बाहेर पडत असल्याचे एमआयएमचे पत्र 'एबीपी माझा'च्या हाती आले असू पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष युसूफ पुंजांनींनी हे पत्र दिले आहे. त्यानुसार, एमआयएमच्या अकोट नगरपालिकेतील पाचही नगरसेवकांनी जिल्हाधिकाऱ्यांनी भाजपसमवेतच्या आघाडीतून बाहेर पडत असल्याचे पत्र दिले. अकोट नगरपालिकेत हिंदुत्वाच्या

पान २ वर

### भाजपकडून कारणे दाखवा नोटीस

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून काँग्रेस आणि एमआयएम समवेत झालेल्या युतीवरुन कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला होता. त्यानंतर, अकोट येथील एमआयएमच्या युतीच्या संदर्भात भाजपा प्रदेशाध्यक्षांनी कडक पाऊल उचलले आहे. येथील विधानसभा आमदार प्रकाश भरसाखळे यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. 'पक्षाची प्रतिमा मलिन झाली, आपल्यावर कारवाई का करण्यात येऊ नये?' असे भाजप प्रदेशाध्यक्षांनी पत्रातून विचारले आहे. त्यामुळे, आता भाजप नेते यावर काय खुलासा देणार ते पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### भाजपच्या आघाडीतून बाहेर पडलेले एमआयएमचे पाच नगरसेवक:

१) रेश्मा परवीन मोहम्मंद अजीम
२) युसुफ खान हादीक खान –
३) हन्नान शाह सुलतान शाह–
४) दिलशाद बी रज्जाक खाँ –
५) अफरीन अंजुम मो. शरीफोद्दीन



## नगरसेवक अशफाक इनामदार कामाचा माणूस

### प्रभागातील नागरिकांच्या सेवेसाठी सज्ज

बीड । दिव्य वार्ता ।

नवनिर्वाचित नगरसेवक अशफाक इनामदार हा खरोखरचं किती कामाचा माणूस आहे. याचा प्रत्यय प्रभागातील नागरिकांना येऊ लागला आहे. प्रभागात आलेल्या घंटा गाडीत कचरा टाकण्यासाठी एक महिला कचऱ्याची बकेट घेऊन पुढे आली.

पान २ वर

## माजलगावची पत्रकारिता नि:पक्षपातीपणाची–आ.सोळंके

### आई–वडीलांची सेवा करणाऱ्यांना काशीसारखे तिर्थक्षेत्र करण्याची गरज नाही–मा.आ.बाजीराव जगताप

- माजलगावात दर्पणसह विविध पुरस्काराचे मोठ्या थाटामाटात वितरण
- कार्यक्रमास महिला, तरूण–तरूणी, पत्रकार प्रेमींची लक्षणीय उपस्थिती



माजलगाव। दिव्य वार्ता ।

**कै. बाळशास्त्री जांभेकर यांच्या विचारांचा वारसा माजलगाव पत्रकार संघाने जोपासला असुन माजलगावची पत्रकारिता नि:पक्षपातीची असल्याचे आमदार प्रकाश सोळंके यांनी सांगीतले तर आई – वडीलांची सेवा करणा–यांना काशीसारखे तिर्थक्षेत्र करण्याची गरज नाही असल्याचे माजी आमदार बाजीराव जगताप यांनी सांगीतले. माजलगाव पत्रकार संघाच्या वतीने दर्पणसह विवीध पुरस्काराचे वितरण दि. ६ जानेवारी २०२६ रोजी शहरातील वैष्णवी मंगल कार्यालयात मोठ्या – थाटामाटात करण्यात आले यावेळी ते बोलत होते.**

अध्यक्षस्थांनी जेष्ठ पत्रकार उमेश मोगरेकर हे तर आमदार प्रकाश सोळंके, आयुष्यमान भारतचे प्रमुख ओमप्रकाश शेटे, सत्कारमुर्ती मा. आ. बाजीराव जगताप, मंगलाताई सोळंके, सुधाकर देशमुख, शेख अब्दुल सत्तार, नुतन नगराध्यक्षा शिफा चाउस, मा. आ. मोहनराव सोळंके, मा. आ. राधाकृष्ण होके पाटील, बहुजन नेते बाबुराव पोटभरे, सहाल चाउस, दयानंद स्वामी, मिलींद आवाड, संपादक शिरीष देशमुख, अनंतशास्त्री जोशी, उपसभापती श्रीहरी मोरे, अशोक डक, नितीन नाईकनवरे, सौ. सुनिता देशमुख यांची उपस्थिती होती. सिंदफणा पब्लिक स्कुलच्या संगीतमंचाने स्वागतगीत सादर करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. कै. बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमापुजन व दिपप्रज्वलन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पुढे बोलतांना आ. सोळंके म्हणाले की, कै. बाळशास्त्री जांभेकर यांनी १८३२

पान २ वर





### यांचा झाला सन्मान

माजलगाव पत्रकार संघाच्या वतीने यंदाचा दर्पण पुरस्कार जेष्ठ पत्रकार सुधाकर देशमुख, माजलगाव भुषण मा. आ. बाजीराव जगताप, समाजभुषण मंगलाताई सोळंके तर यशस्वी उद्योजक म्हणुन शेख अब्दुल सत्तार तर विशेष सत्कार नुतन नगराध्यक्षा शिफा बिलाल चाउस यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मानपत्र, सन्मानचिन्ह, हार, पुष्पगुच्छ व शाल देउन सन्मान करण्यात आला.

## खादमीन-ए-उम्मत संस्थेच्या वतीने 'आफताब-ए-सहाफत' विभागीय पुरस्कारासाठी अ‍ॅड.इकबाल रसूलसाब शेख यांची निवड

लातूर। दिव्य वार्ता ।

साहित्यिक, स्तंभलेखक, कवी, पत्रकार तसेच विधिज्ञ अ‍ॅड.इकबाल रसूलसाब शेख यांना नांदेड येथील खादमीन–ए–उम्मत या स्वयंसेवी संघटनेतर्फे जाहीर करण्यात आलेला 'आफताब–ए–सहाफत' (पत्रकारितेचा सूर्य) विभागीय पत्रकारिता पुरस्कार येत्या १८ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथे एका विशेष समारंभात प्रदान केला जाणार आहे. अ‍ॅड.इकबाल रसूलसाब शेख यांच्या कविता व लेखनाचे मराठी व हिंदी वृत्तपत्रांतून नियमित प्रकाशन होत असते ते सा.लातूर रिपोर्टरचे कार्यकारी संपादक व स्तंभलेखक असून 'प्रश्नचिन्ह' व 'आँखों देखा हाल' या नावाने प्रसिद्ध होणारे त्यांचे स्तंभलेख वाचकप्रिय ठरले आहेत. गेल्या वीस वर्षांहून अधिक काळ ते मराठी व हिंदी पत्रकारितेत सक्रिय असून, सध्या ते विविध वर्तमानपत्रांमध्ये लेखन करीत आहेत. पत्रकारितेसोबतच ते सामाजिक कार्यातही अग्रेसर असून, गेल्या २५ वर्षांपासून 'खिदमत–ए–खल्क' व 'सोशल वेल्फेअर सोसायटी' च्या माध्यमातून सामाजिक कार्यात सतत कार्यरत आहेत.



त्याचप्रमाणे शैक्षणिक क्षेत्रातही त्यांचे मोलाचे योगदान असून, ऑर्बिट प्री–प्रायमरी इंग्लिश स्कूल व राहत अकॅडमीच्या माध्यमातून दर्जेदार शिक्षण देण्याचे कार्य ते करीत आहेत.अनेक क्षेत्रांतील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत खादमीन–ए–उम्मत संस्थेने त्यांची या विभागीय पुरस्कारासाठी निवड केली आहे. 'आफताब–ए–सहाफत' हा प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रांतून अ‍ॅड.इकबाल रसूलसाब शेख यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.दरम्यान,खादमीन–ए–उम्मत संस्थेचे अध्यक्ष आबेद खान हमीद खान यांच्या वतीने पुरस्कार निवडीचे पत्र अलहाज सलीम अलंद सर व अलहाज सय्यद म.सलीमोद्दीन करीमोद्दीन सर यांच्या हस्ते प्रदान करून अ‍ॅड.इकबाल रसूलसाब शेख यांना शुभेच्छा देण्यात आल्या. हा पुरस्कार जाहीर झाल्यानंतर ड इक्बाल शेख यांचे सर्व स्तरातून शुभेच्छा व अभिनंदन करण्यात येत आहे.

## बीडच्या रेल्वे पेक्षा जत्रेतली रेल्वे बरी

### रेल्वेला गती कधी मिळेल–शेख युनूस







बीड । दिव्य वार्ता ।

बीड ते अहिल्यानगर रेल्वेचे उद्घाटन १७ सप्टेंबर २०२५ रोजी झाले.१६६ किलोमीटर रेल्वेचे काम पूर्ण झाले पण या रेल्वेला बीड ते अहिल्यानगर जाण्यासाठी सहा ते सात तासाचा प्रवास करावा लागत आहे. रेल्वेला गती कधी मिळेल ? त्यासाठी आत्तापर्यंत १२८६ कोटी खर्च झालेले असून रेल्वे मात्र १७ स्टॉप घेऊन त्यात अजून फाकट उघडण्यासाठी रेल्वेच्या कर्मचाऱ्याला उतरून ते परत लावावे लागत आहे. तर यापेक्षा जत्रेतली रेल्वे बरी असेच म्हणावे लागेल. चाळीस वर्षाच्या कालावधीनंतर बीड ला रेल्वे येवूनही प्रवासाला काहीच उपयोग झालेला नाही.कारण तिथे जाण्यासाठी रिक्षावाले दीडशे ते दोनशे रुपये घेतात. त्यात रेल्वे स्टेशनची काय अवस्था झाली यakडे पण प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. असे दिसून येत आहे.कोणी लक्ष देत नाहीं. नागरिकाकडून बोलले जात आहे की रेल्वे येऊन उपयोग काय ? यापेक्षा तर जत्रेतील रेल्वे

## जि.प. उच्च प्राथमिक शाळा मानकेश्वर येथे सामान्यज्ञान स्पर्धेचे आयोजन



जिंतूर । दिव्य वार्ता ।

दिनांक ०८ जानेवारी २०२६ रोजी जि. प. उच्च प्रा. शा. मानकेश्वर येथे 'लेक वाचवा लेक शिकवा' या उपक्रमातर्गत शाळेचे उच्चश्रेणी मुख्याध्यापक संजाबराव देशमुख सर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली व ईटोली केंद्राचे केंद्रप्रमुख दिलिप साबळे सर, सत्येन्द्र चोले सर यांच्या उपस्थितित क्रांती ज्योती साविञीबाई फुले यांच्या जीवन चरिञावर सामान्यज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये ४५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी शाळेतिल शिक्षक शिवाजी लाटे सर, कैलास पांडे सर,शिवसाम्भ मुक्कनवार सर,श्रीमती सुनिता मगर मॅडम, श्रीमती दिपालीताई ढोले मॅडम, दत्तराव बुधवंत यानी तसेच शाळा व्यवस्थापन समिती आणि गावकरी यानी परिश्रम घेतले.

## जिंतूरात उद्योजक मेळाव्याचे आयोजन

जिंतूर । दिव्य वार्ता ।

शहरातील छत्रपती शिवाजी नगर मधील लक्ष्मी मंगल सेवा कार्यालयात एस ४ ग्रुप परभणी यांच्या वतीने शुक्रवार दिनांक ०९ जानेवारी रोजी सकाळी १० ते सायंकाळी ०८ वाजेपर्यंत एक दिवसीय उद्योजक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात वेगवेगळे वीस स्टॉलची मांडणी करण्यात येणार आहे. सध्या ऑनलाइन खरेदी मुळे छोट्या मोठ्या उद्योग समूहांना मोठा फटका बसत असून किमान मराठी सण उत्सवाला तरी नागरिकांनी स्थानिक दुकानदारां कडून खरेदी करून त्यांना दिलासा मिळावा या उदात्त हेतूने शकुन बजाज यांच्या संकल्पनेतून या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून शहरासह तालुक्यातील महिला भगिनींनी एक वेळ या मेळाव्यास अवश्य भेट द्यावी असे आवाहन स्नेहा शाह यांनी केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२–२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२–२३१२२०